## थोडक्यात...

### १७-परभणी लोकसभा मतदार संघाकरीता आज २६ नामनिर्देशन पत्रांचे वितरण

**परभणी** - १७-परभणी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीकरीता मतदार संघातून आज एकूण २१ जणांना २६ नामनिर्देशन पत्राचे वितरण करण्यात आले. आज एकही नामनिर्देशन पत्र दाखल झाले नाही. सार्वजनीक सुट्यांचे दिवस वगळता नामनिर्देश पत्र दाखल करण्याची शेवटची दिनांक गुरुवार ०४ एप्रिल, २०२४ असल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभाग, परभणी यांनी कळविले आहे.

### श्रीमती दैवशाला धोपटे यांचे निधन



**(दशरथ शिंदे/दै.धर्मयोध्दा)**

**मानवत** - तालुक्यातील मौजे पोहंडूळ येथील श्रीमती दैवशाला ज्ञानोबा धोपटे यांचे बुधवार दिनांक २० मार्च २०२४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती ज्ञानोबा बाबाराव धोपटे मुलगी अश्विनी मुंजाभाऊ डक,गीता रणजीत ठोंबरे सासू लोचनाबाई बाबाराव धोपटे, दीर शिवराम बाबाराव धोपटे,जाऊ अंजना शिवराम धोपटे, पुतण्या सागर शिवराम धोपटे व पुतणी भक्ती कैलास कदम तसेच नातवंडे असा परिवार आहे.

### शशिकलाबाई भंडारे यांचे निधन




**(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)**

**जिंतूर** - शहरातील आनंदेश्वर महादेव मंदिर परिसरातील रहिवासी शशिकलाबाई बाबूराव भंडारे (वय ८०) यांचे गुरुवारी (ता.२८) पहाटे पाचच्या सुमारास हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. दुपारनंतर वैकुंठधाम सार्वजनिक स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. शशिकलाबाई यांच्या पश्चात वैजनाथराव भंडारे, डॉ. अशोक भंडारे व माजी नगरसेवक विलास भंडारे ही तीन मुले, दोन मुली, जावई,सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### उबाठा गटाच्यावतीने तीथिनुसार शिवजयंती उत्साहात साजरी



**(गणेश सवणे/दै.धर्मयोध्दा)**

**सेलू**- येथे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख संजयभाऊ साडेगावकर,उपजिल्हाप्रमुख रंजित तात्या गजमल,शहरसमन्वयक मनिषभाऊ कदम,मा.नगराध्यक्ष विनोदराव बोराडे,उपनगराध्यक्ष प्रभाकर सुरवसे,तालुकाप्रमुख रामेश्वर बहिरट,वारकरी संप्रदाय तालुकाप्रमुख विठ्ठल महाराज कारके,दलित आघाडीचे तालुकाप्रमुख गौतम कनकुटे,युवासेना शहरप्रमुख वैभव वैद्य,कॉंग्रेसचे नगरसेवक विनोद भाऊ तरटे, नवनाथ खांडेकर,विष्णु नाईकनवरे,किशोर भांडवले,उपशहरप्रमुख अक्षय डिग्रसकर,युवासेना उपजिल्हाप्रमुख दत्तराव झोल,मा.सभापति अंकुश लोंढे,गुलाबराव खेडेकर,आदि पदाधिकारी उपस्थित होते

# ही मोफत शिबीरे नव्हे, हा तर रुग्णसेवेचा महायज्ञ - आ.डॉ.राहुल पाटील

## नवजात शिशू व लहान मुलासाठी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन



**(आकाशदिप लंगोटे /दै.धर्मयोध्दा)**

**परभणी** - डॉ. राहुल पाटील हॉस्पिटल आणि रिसर्च इन्स्टिटयूट व परभणी वैद्यकिय महाविद्यालय येथे दि. २७ मार्च २०२४ या रोजी नवजात शिशू व लहान मुलांसाठी मोफत तपासणी शिबिर आयोजीत करण्यात आले होते .या शिबिरात सकाळी ९ ते ५ या वेळेत प्रसिध्द डॉ. बाबासाहेब गायकवाड आणि डॉ. अजय गिरी बालरोग तज्ञ यांनी तपासणी केली . शिबिरात कमी वजनाचे बाळ, अपुर्ण दिवसाचे बाळ, काविळ, जंतू संक्रमण, जन्मदोष तसेच फुफुस्साच्या आजार तसेच लहान मुलांमधील न्युमोनिया, टायफाईड, काविळ, लहान मुलांचा पॅरेलेसिस, मेंदूचे झटके, डोक्यात ताप जाणे, अर्धांगवायुचा झटका याचबरोबर विविध आजारांची मोफत तपासणी नंतर आवशक्यता भासल्यास ज्या रूग्णांना पुढील उपचाराची गरज असेल त्या रूग्णांना मोफत उपचार सुविधा महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत करून दिली जाणार आहे.शिबिरासाठी बालरोग तज्ञ डॉक्टरांची टीम कार्यरत करण्यात आली असून, २४ तास नवजात शिशू अतिदक्षता विभाग तसेच व्हॅल्टीलेटर्सची याचबरोबर नवजात बाळासाठी मोफत पेटीची वार्मर उपलब्धता करून देण्यात आली आहे तसेच प्रशस्त वार्ड देखिल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. याचबरोबर रक्त, लघवी आणि इतर तपासण्यांची देखिल अल्पदरात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पॅरेलेसिस, लकवा रूग्णांकरीता तज्ञ फिजीओथेरेपीस्ट व्दारा मोफत व्यायाम व उपचार तसेच सल्ला दिला जाणार आहे. रोगनिदानात विलंब योग्य आहार आणि बाळ संगोपन याबद्दल असणारी अपुरी माहिती हे लहान मुलांमध्ये होणाऱ्या आजारांची मुख्य कारणे आहेत त्यातच ग्रामीण भागातील जनतेला वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत नाहीत या हेतूने आर पी हॉस्पिटल आणि रिसर्च इन्स्टिटयूट परभणी मेडिकल कॉलेज तर्फे लहान मुलासाठी मोफत रोग निदान व आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या मध्ये बालरोग व नवजात शिशु तज्ज्ञ डॉ. बाबासाहेब गायकवाड आणि डॉ. अजय गिरी यांनी लहान मुलांची तपासणी केली ज्यात प्रामुख्याने वजन न वाढणे जन्मजात हृदयरोग श्वसनाचे आजार मेंदू विकार पोटाचे विकार या वरती उपचार करण्यात आले तसेच लहान बालकांचे लसीकरण आणि आहार समुपदेशन करण्यात आले.

## परभणी लोकसभा मतदार संघाकरीता निवडणूक निरीक्षक (खर्च) अनुराग चंद्रा यांची नियुक्ती




**परभणी** - लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने १७ परभणी लोकसभा मतदार संघाकरीता अनुराग चंद्रा (आय.आर.एस.) यांची निवडणुक निरीक्षक (खर्च) म्हणुन नियुक्ती केली आहे.

निवडणूक निरिक्षक (खर्च) अनुराग चंद्रा यांच्याशी संपर्क साधण्यासाठी मोबाईल क्रमांक ७४२०८४०७८१ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. निवडणूक कालावधीत अनुराग चंद्रा यांचा मुक्काम सावली शासकीय विश्रामगृह, परभणी येथे असणार आहे. निवडणुक निरीक्षक (खर्च) यांचे संपर्क अधिकारी म्हणुन जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन कवटे यांची नियुक्ती करण्यात आल्याचे असे जिल्हा निवडणूक यंत्रणेने कळविले आहे.

## लोकशाहीसाठी विद्यार्थ्यांनी मतदार दूत बनावे- विस्तार अधिकारी गणराज येरमाळ



**परभणी** – भारतीय लोकशाही मजबूत करण्यासाठी आणि होऊ घातलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठि शंभर टक्के मतदान झाले पाहिजे. यासाठी प्रत्येक घटकाची जबाबदारी म्हणून काम करणे गरजेचे आहे.यातच प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले आई-वडील,शेजारी, नातेवाईक यांना लोकसभेसाठि मतदान करावे म्हणून हट्ट धरावा. मतदान करण्यापासून कोणीही वंचित राहु नये यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी मतदार दूत बनावे असे आवाहन शिक्षण विस्तार अधिकारी तथा जिल्हास्तरीय स्वीप पथकाचे मार्गदर्शक गणराज येरमाळ यांनी केले. शहरातील एकता नगर येथील गांधी विद्यालयात बुधवार (दी.२७) रोज नोडल अधिकारी गणेश शिंदे यांच्या सूचनेनुसार जिल्हा स्तरीय स्वीप पथकाच्या वतीने मतदार जनजागृति अभियान कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी गणराज येरमाळ, पर्यवेक्षक आर. आर. जाधव, सहाय्यक पर्यवेक्षक पी.आर. जाधव, डी. एल.नखाते, प्रवीण वायकोश, हनुमंत हंबिर, अरविंद शहाणे, प्रेमेंद्र भावसार, त्र्यंबक वडसकर, रामप्रसाद अवचार, भारत शहाणे, मोहन आल्हाट, महेश देशमुख ,प्रसन्न भावसार आदिंची उपस्थिती होती.याप्रसंगी मतदान गीत, लघुनाटिका अदि माध्यमातुन जनजागृति करण्यात आली.यावेळी मतदार दूत म्हणून विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.सूत्रसंचालन बबन आव्हाड यांनी तर आभार पी.आर. जाधव यांनी मानले.

## जिंतूर रोड ते असोला पाटी बायपास रस्त्यास सर्विस रोड देण्यात यावा शेतकऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**(आकाशदिप लंगोटे/ दै.धर्मयोध्दा)**

**परभणी** - आज गुरुवार २८ मार्च रोजी दुपारी ४ ४५ वाजेच्या सुमारास परभणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने परभणी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की. परभणी तालुक्यातील पारवा ते असोला पाटी परभणी शहर बाह्यवळण बायपास रस्त्याचे काम सुरु आहे. परंतु जिंतुर रोड ते असोला पाटी दरम्यान होत असलेल्या रस्त्यास सर्व्हस रोड देण्यात आलेला नाही आणि जेथे अंडरपास (पुल) आहे तेथील पुलाच्या बाजूस जी जागा शिल्लक आहे ती देखील बंद करण्यात आली आहे. त्यामुळे आम्ही शेतकरी आमच्या शेतात जाऊ शकत नाही कारण आमची बाह्यवळण रस्त्याच्या दोन्ही बाजुस शेती आहे. ती सदरील जमीन हि परभणी शहर महानगरपालिका परभणी च्या हद्दीत आहेत. तसेच होणाऱ्या बायपास रस्त्याच्या दोन्ही बाजुने बॅराकेटींग करण्यात येणार आहे त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजुने आणि दुसऱ्या शेतात जाता येणार नाहीआणि उतरता येणार नसल्यामुळे आम्ही शेतकरी फार अडचणीत आलो आहोत आम्हाला शेतात जाण्यास दुसरा मार्ग उपलब्ध नसल्यामुळे सदरील होत असलेल्या बाह्यवळण रस्त्यास सर्व्हिस रोड उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर गणेश ढगे , गिरीश देशमुख , परमेश्वर ढगे , महेश देशमुख , सुशीलकुमार देशमुख , गणेश देशमुख , राजेश देशमुख , योगेश देशमुख , पांडुरंग झोरे , नितेश देशमुख , गणेश शिंदे , रामदास बालटकर , राजाभाऊ सानप आदींसह शेतकऱ्यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत

## लोकसभेसाठी लागणाऱ्या मतदान यंत्रांचे वाटप



**परभणी** – लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी लागणाऱ्या मतदान यंत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी ईव्हीएम यंत्राचे नोडल अधिकारी श्री गोविंद रणवीरकर व उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री जनार्दन विधाते यांच्यासह कर्मचारी व पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालय परिसराची निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी पाहणी केली. (छाया-उत्तम बोरसुरीकर)

## जिंतूरमध्ये गो मातेला घातली चोळी



**(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)**

**जिंतुर** - शहरातील वट्टमवार परिवार तर्फे अनोखा उपक्रम राबविन्यात आला. त्या वेळी आध्येगिक वसाहत येथे सौ.रूपाली वट्टमवार, सौ.राधिका वट्टमवार, सौ.अंबिका वट्टमवार, सौ.विमल वट्टमवार, सौ.हेमालता वट्टमवार, सौ.मीरा वट्टमवार, सनिका वट्टमवार परिवार उपस्थितीत गो मातेला साडी पांघरून तिला गोड पदार्थ, हिरवा चारा, पेड खाऊ घालन्यात आली. वट्टमवार परिवारने लहानपणा पासून ही गाय पाळली आणि ती गाय आज गर्बवती राहिली, त्या मुळे नवीन उपक्रम करत गो मातेचीच चोळी ( गोद भराई ) असेही म्हणतात. हे जर उपक्रम केलातर गो हत्या होणार नाही व गो माता आपल्या कुटूबातील एक भाग म्हणून समजल्या जाइल.

एकी कडे गो हत्याचे प्रमाण वाढत चालले दिसत आहे. पण जिंतूर मध्ये वट्टमवार परिवारने हा उपक्रम करून गो हत्या होऊ नये म्हणून वेगळा संदेश देण्यात आला. जर प्रत्येक समाजाने अशा प्रकारे उपक्रम केल्यास गो हत्या होणार नाहीच पण गाय ची रक्षा पण होईल.

## मोकळ्या जागेतील किरायेदार व गाळेधारक यांचा नियमबाह्य किराया वाढवल्यामुळे जिल्हाधिकारी यांना निवेदन



**(दशरथ शिंदे /दै.धर्मयोध्दा)**

**मानवत** - शहरातील मोकळ्या जागेतील किरायदार व गाळेधारक यांचा नियमबाह्य किराया वाढ करण्यात आल्याकारणांनी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे साहेब यांना निवेदन देण्यात आले न.प.जागेतिल किरायदार गाळेधारकांना चारपट व काही जणांना दुप्पट पेक्षा जास्त केला आहे व मोकळ्या जागेवरील किरायदारांना अडीच पट पेक्षा जास्त किराया वाढवला आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव नसल्याकारणाने यावर्षी बाजारपेठेमध्ये मंदी आहे. या मंदीच्या काळात नगरपरिषद मानवत येथील सर्व किरायदार मोठ्या कसरतीने व्यवसाय करून नगरपरिषद मानवतचा किराया भरत आहेत. बाजारपेठेत शुकशुकाट, असल्या कारणाने पहिलाच किराया थकीत आहे. अशा परिस्थितीत नगरपरिषद प्रशासनाने किरायात वाढ करणे म्हणजे किरायादाराला उध्वस्त करणे आहे. मानवत शहरातील ८० व्यापारी पाथरी येथे अल्प दरात दुकाने उपलब्ध होत आहेत व बाजारपेठही चांगली असल्या कारणाने स्थलांतरित झाले आहेत यामुळे मानवत शहराच्या व्यापार पेठेवर परिणाम झालेला आहे. या सर्व बाबींचा विचार करून मे. साहेबांनी नगरपरिषद मानवत प्रशासनाची नियमबाह्यदर किराया वाढ मागे घेऊन किरायदारांना सहकार्य करावे ही विनंती या निवेदनावर शिवसेना शहर प्रमुख अनिल जाधव यांच्या सह जिल्हा सचिव राम राजे महाडीक,तालुका प्रमुख माणिकराव काळे,मानवत कृषि उत्पन्न बाजार समिति चे सभापति पंकज आंबेगावकर, सुधाकर मोरे, मधुकर खटले, मनोज दहे, सुभाष पानझाडे, दामोदर रासवे. यांच्या सह सर्व गाळेधारक किरायदार व मोकळया जागेतिल किरायाधारकांच्या स्वाक्षऱ्या आहेत...

# धक्कादायक!समृद्धी महामार्गाच्या कामासाठी जांबच्या तळ्यातील गाळाचा वापर!

## मा.खा.सुरेश जाधव यांनी केली जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार



**परभणी** - समृद्धी महामार्गाच्या परभणीस्थित बायपास रोडच्या भराव व इतर कामासाठी परभणी तालुक्यातील जांब या तलावातील गाळ शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून वापरला आहे.यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आदर्श ठरणाऱ्या समृद्धी महामार्गाच्या कामाचा एजन्सीकडून बट्याबोळ उडाल्याचे दिसून आलेय याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्ह्याचे



माजी खासदार अँड.सुरेश जाधव यांनी तक्रार दिली आहे.तक्रारीत असे नमूद करण्यात की,समृद्धी महामार्गाच्या कामासाठी असे कुठेही मृतगाळ टाकण्याचे अंदाजपत्रकात नमूद नसताना वापरण्यात येत आहे.सदरच्या जांब येथील तलावात खडकाळ जमीन अथवा मुरुम नसून काळी मातीस्वरुप असणारा गाळ काढून शेकडो हायवाद्वारे या रस्त्याला हा गाळ वापरण्यात येत आहे.रस्ता मजबुतीकरण करतांना काही विकसीत बाबी नमूद असतात.यात लाल खडकाळ मुरुमाचा रस्त्यासाठी वापर करणे हे बंधनकारक असतांना चांगल्या दर्जाचा दगड हा बांधकामासाठी वापरणे महत्वाचे असतांना राज्य शासन आणि केंद्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या या प्रकल्पाला ही एजन्सी बोगस काम करुन हरताळ फासण्याचा प्रयत्न करत असून गौण खनिज विभागाने किती ब्रासची एजन्सीकडून स्वामीत्वधन भरणा करुन घेतला आहे व किती ब्रास माल वापरण्यात आला आहे.याची तपासणी करत नियंत्रण अधिकारी कोण आहेत यांचीही चौकशी करुन त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करत या रस्त्याचा दर्जा सुधारण्यासाठी गुणनियंत्रण पथकाकडून याची तपासणी करून निकृष्ठ दर्जाचे काम थांबवत सदरच्या एजन्सीवर कडक कारवाई करण्यात यावी असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### नियंत्रण कोणाचे ?तर अधिकाऱ्यांची चालढकल

मागील अनेक महिन्यापासून परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्यात येतात.ही विकासकामे करत असताना अधिकारी स्वतःचे राज चालवतात बोगस कंपनीच्या माध्यमातून करण्यात येणारे काम आणि चिरीमिरी घेऊन नियंत्रण ठेवणारे वरिष्ठ यातच अधिकाऱ्यांची अधिकारशाही सुरु असल्याने या बोगस कामाला वाव मिळत असून सोनपेठ तालुक्यातील शेळगाव येथील मुरुम प्रकरणही अशाच प्रकारचे आहे.यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत असतांना सोनपेठचे कर्तव्यदक्ष तहसीलदार सुनिल कावरखे यांनी कारवाईत तथ्य आढळून आल्यास कार्यवाही करणार असल्याचे सांगितले आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published A√t Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao